# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि ३१/2020 दिनांक: 14 /05/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र . No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 5 मे 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-278/2020 दिनांक 06.05.2020

**( मुर्तिजापुर, अकोट व बाळापुर क्षेत्रातील संचारबंदीची वेळ कमी जास्त करण्याचे अधिकार प्रदान करणे. )**

## आदेश

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 13 मार्च,2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना *विषाणुमुळे* COVID-१९ उदभवणालीन षयक आपत्का आजारामुळे आरोग्यिया संसर्गजन्य- संसर्ग रोगाच्यापरिस्थिती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उदभवलेल्यानियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2,3 व 4 ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरु करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अकोला जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्यामुळे आपतकालिन योजना करणे गरजेचे असल्यामुळे अकोला जिल्हायामध्ये संदर्भीय आदेश क्र. ६ अन्वये **दिनांक १७.०५.२०२० चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. आणि**

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. स्पष्टीकरण No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ५ मे 2020 **दिनांक** 17.05.2020 **पर्यंत लॉकडाऊन कालावधीमध्ये मार्गदर्शकतत्वे नमूद करण्यात आले आहेत. आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. तसेच सदर विषाणूचा फैलाव जिल्हयातील सर्वच क्षेत्रामध्ये होत असल्याचे दिसून आले आहे. त्या अनुषंगाने मा. आमदार श्री. गोवर्धन शर्मा अकोला व मा. आमदार श्री. हरिषजी पिंपळे मुर्तिजापुर यांनी जिवनावश्यक कार्यासाठी दुपारी 4.00 वाजेपर्यंत सुट देण्यात आली आहे. परंतू जिल्हयामध्ये वाढणा-या कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेता वाढविण्यात आलेल्या कालावधीमुळे संपर्कात वाढ होवून रुग्ण वाढीचा धोका नाकारता येत नसल्यामुळे सकाळी 8.00 ते दु. 12.00 वेळ कायम ठेवण्यात यावी असे संदर्भीय पत्राद्वारे कळविले आहे.

**त्याअर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार दिनांक 06.05.2020 रोजी संपूर्ण जिल्हयासाठी

..2..

NitinN 395

अत्यावश्यक सेवा वगळता इतर सेवांना सुरु ठेवण्याकरिता सकाळी 06.00 ते दुपारी 04.00 या कालावधीत सूट देण्यात आलेली आहे.

सबब, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव होण्यापासून प्रतिबंध करण्याकरिता तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून कोणताही अनुचित प्रकार घडू नये या दृष्टीकोनातून संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी समन्वय साधून संचारबंदीचे कालवधीमध्ये विविध व्यवसायाच्या प्रतिष्ठानांना सुरु ठेवण्याबाबत कालावधी कमी जास्त करण्याचे **अधिकार संबंधीत उपविभागीय दंडाधिकारी यांना याद्वारे प्रदान करित आहे.** संबंधीत उपविभागीय अधिकारी यांनी आपआपले कार्यक्षेत्राकरिता संचारबंदी कालावधीचे स्वतंत्र आदेश निर्गमित करुन आदेशाची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

सदर आदेश आज **दिनांक 14 मे 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय अकोला
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**

**प्रतिलीपी:-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
6. सहा. आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता
7. मॅनेजर लिड बँक, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. तहसिलदार -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
10. विभाग प्रमुख --------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
11. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**